# स्त्री सक्षमीकरण व लिंगभाव संवेदनशीलता विकसित करण्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयोगिता

**डॉ. सीमा विठ्ठलराव शेटे**
*समाजशास्त्र प्रभारी प्राचार्य तथा प्राध्यापक, सावित्री जोतीराव समाजकार्य महा. यवतमाळ*

**प्रस्तावना :**

आधुनिक युग हे तंत्रज्ञानाच्या झपाट्याने प्रगत होणाऱ्या युगाचे प्रतीक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानवाचे जीवन अधिक सुलभ, कार्यक्षम आणि माहितीप्रधान झाले आहे. उत्तर-आधुनिक काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) हे असे साधन आहे जे मानवी विचारप्रक्रिया, निर्णयक्षमता आणि विश्लेषणशक्तीला तांत्रिक माध्यमातून पूरक ठरते.

आज या तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण, आरोग्य, उद्योग, प्रशासन, सामाजिक परिवर्तन अशा अनेक क्षेत्रांत होत आहे. त्याचप्रमाणे लिंगभाव समता व संवेदनशीलता विकसित करण्यासाठीही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रभावीपणे होऊ शकतो. स्त्री-पुरुष समानतेसाठी आणि स्त्री सक्षमीकरणासाठी AI हे एक आधुनिक आणि उपयुक्त साधन ठरू शकते.

**संशोधनाचा उद्देश :**

- लिंगभाव संवेदनशीलतेच्या जडणघडणीत AI ची भूमिका स्पष्ट करणे.
- स्त्री सक्षमीकरण, शिक्षण, सुरक्षा आणि रोजगारामध्ये AI चे योगदान मांडणे.
- समाजात समान संधी निर्माण करण्यासाठी AI च्या साधनांचा प्रभावी वापर कसा करता येईल यावर चिंतन करणे.

**लिंगभाव संवेदनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता :**

समाजातील लिंगभेदात्मक विचारसरणी अजूनही काही प्रमाणात अस्तित्वात आहे. पारंपरिक काळात स्त्रियांना शिक्षण, तंत्रज्ञान आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी कमी मिळत असे. मात्र, AI च्या आगमनानंतर परिस्थिती बदलू लागली आहे.

AI आधारित तंत्रज्ञान समाजमाध्यमांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी, महिला सुरक्षा वाढविण्यासाठी आणि समभावाची भावना दृढ करण्यासाठी उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ – AI च्या सहाय्याने तयार केलेले लघु व्हिडिओ (Reels), डिजिटल कॅम्पेन, जनजागृती □प्स हे समाजमनावर प्रभाव टाकतात आणि लिंगसमभावाचा संदेश पोहोचवतात.

**स्त्री सक्षमीकरण आणि AI ची भूमिका :**

- AI हे केवळ तांत्रिक साधन नाही, तर सामाजिक परिवर्तनाचे माध्यमही आहे. स्त्रियांना तंत्रज्ञानाची जाण झाल्यास त्यांचे आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि करिअर संधी वाढतात.
- महिलांना तंत्रज्ञान प्रशिक्षण, कोडिंग, डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या कौशल्यांचा अभ्यास देता येतो.
- महिलांसाठी तयार केलेले AI संचालित हेल्पलाइन □प्स, सेफ्टी अलर्ट सिस्टीम्स, GPS ट्रॅकिंग डिव्हाइसेस यांमुळे त्यांच्या सुरक्षिततेत वाढ होते.
- “सखी वन स्टॉप सेंटर” किंवा “महिला हेल्पलाइन” यांसारख्या केंद्रांना AI आधारित साधनांची जोड दिल्यास आपत्कालीन मदत त्वरित मिळू शकते.

**AI आणि महिला उद्योजकता :**

- महिला उद्योजकांसाठी AI हा व्यवसाय वृद्धीचा प्रभावी साधन आहे.
- आर्थिक व्यवस्थापन, डिजिटल मार्केटिंग, स्वयंचलित लेखापरीक्षण यासाठी AI चा उपयोग वाढत आहे.
- ऑनलाइन जाहिराती, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि डेटा ॲनालिटिक्स यामुळे महिला उद्योजकांना ग्राहकवर्ग, बाजारपेठ आणि उत्पादन सुधारणा याबाबत दिशा मिळते.
- निर्णयक्षमतेत वाढ करून महिलांना स्वावलंबनाचा मार्ग उपलब्ध होतो.

**शिक्षण क्षेत्रातील AI आणि लिंगसमभाव :**

- AI मुळे शिक्षण अधिक सुलभ, लवचिक आणि वैयक्तिक गरजांनुसार अनुकूल झाले आहे.
- ChatGPT सारख्या साधनांमुळे भाषांतर, निबंधलेखन, अभ्याससाहित्य तयार करणे यास मदत मिळते.
- ग्रामीण व अल्पसंसाधन असलेल्या भागातील मुलींनाही ऑनलाइन शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.
- AI आधारित ट्रान्सलेशन □प्स, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स आणि आभासी शिक्षक यांच्या माध्यमातून महिलांचे शैक्षणिक सक्षमीकरण साध्य होत आहे.

**महिला सुरक्षा क्षेत्रातील AI :**

- महिलांच्या सुरक्षिततेसाठी AI आधारित प्रणालींचा उपयोग मोठ्या प्रमाणात होत आहे.
- स्मार्ट वेअरेबल डिव्हाइसेस (उदा. SOS बँड्स, सेफ्टी वॉचेस) संकटाच्या क्षणी पोलिसांना व कुटुंबाला संदेश पाठवू शकतात.
- AI आधारित सीसीटीव्ही विश्लेषण तंत्रामुळे सार्वजनिक ठिकाणी असुरक्षित परिस्थिती आधीच ओळखता येते.
- प्रवासादरम्यान सुरक्षिततेसाठी मोबाइल □प्स आणि आभासी सहाय्यक (Virtual Assistants) उपयुक्त ठरतात.

**AI आणि सामाजिक परिवर्तन :**

AI च्या माध्यमातून समाजात लिंगसमभाव व संवेदनशीलता निर्माण करणे हे आधुनिक युगाचे मोठे

आव्हान आणि संधी दोन्ही आहे. AI च्या विश्लेषणक्षमतेचा उपयोग करून धोरणनिर्मिती, सर्वेक्षण, प्रशिक्षण आणि जनजागृती अधिक प्रभावीपणे राबवता येते. शासन, सामाजिक संस्था आणि शैक्षणिक क्षेत्रांनी या दृष्टीने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

- ❖ लिंगभाव संवेदनशीलतेच्या विकासात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.
- ❖ AI च्या माध्यमातून शिक्षण, सुरक्षा, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक जाणीव या सर्व क्षेत्रांत महिलांचा सहभाग वाढवता येतो. तंत्रज्ञानाची योग्य दिशा आणि प्रशिक्षण दिल्यास स्त्रिया केवळ सहभागी नाही तर परिवर्तनाच्या केंद्रस्थानी राहू शकतात. त्यामुळे आधुनिक समाजात "AI साक्षर स्त्री" म्हणजेच खऱ्या अर्थाने सशक्त स्त्री असे म्हटले जाऊ शकते.

**संदर्भ :**

1. महाराष्ट्र शासन – महिला व बाल विकास विभाग अहवाल (2024)
2. UNESCO Report on Gender Equality and AI (2023)
3. National Policy for Women Empowerment through Technology, Govt. of India
4. AI for Social Good – NITI Aayog Publication